PDF Compressor Free Version

**व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकार्यालय**
बंगला नं.10/2, स्टार्की टाऊन, सदर, मंगळवारी मार्केटचे जवळ, नागपूर – 440 001
दुरध्वनी क्र.0712-2978844, E-mail ID : mahaecotour.sm@mahaforest.gov.in
प्र.मु.व.सं.(व.ब.प्र.),म.रा.,वनभवनरामगिरीरोड सिव्हीललाईन्स,नागपूर-440001

विषय:- महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २८/०२/२०२० रोजी आयोजित १० व्या सभेच्या कार्यवृत्ताबाबत .

क्रमांक-व्यसं/मनिपविम-सभा/प्र.क्र.१०/ 468/१९-२०
नागपूर-४४० ००१, दिनांक : 08 ~~फेब्रुवारी~~ मार्च २०२०

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि. नागपूर तथा सदस्य कार्यकारी समिती.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
४. प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव),महाराष्ट्र राज्य,नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
५. अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.
६. अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (महा कॅम्पा),महाराष्ट्र राज्य,नागपूर तथा सदस्य,कार्यकारी समिती.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ,मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी .
९. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे
१०. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर
११. मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. व्यसं/मनिपविम-सभा/प्र.क्र.१०/४४८/१९-२० दिनांक २७/०२/२०२०.

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची सभा, मा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८/०२/२०२० रोजी १२.०० वाजता "कंट्रोल कमांड रुम", वनभवन, नागपूर येथे संपन्न झाली. सदर सभेचा कार्यवृत्तांत सोबत माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

सहपत्र:- वरील प्रमाणे.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

3/3/2020

PDF Compressor Free Version

प्रतिलिपी:- १. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ यांना वरीलप्रमाणे सहपत्रांसह माहितीस्तव सादर.

२. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व/मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सर्व यांना वरील प्रमाणे सहपत्रासह योग्य त्या कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

३. वनसंरक्षक (प्रादेशिक), यवतमाळ यांना वरील प्रमाणे सहपत्रासह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

४. वनसंरक्षक व उपवनसंरक्षक (वन्यजीव) सर्व /विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) सर्व यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

प्रत — कक्ष-२, योजना, मनिपाधिमं यांना सहपत्रांसह माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

PDF Compressor Free Version

# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक २८/०२/२०२० रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या सभेचा कार्यवृतांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची १० वी सभा दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० रोजी १२.०० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली **"कमांड कंट्रोल रुम "** वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समिती सदस्यांची यादी ***(परिशिष्ट-१)*** नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य-सचिव यांनी ***दहाव्या सभेच्या*** सुरुवातीस अध्यक्षांचे स्वागत केले व उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे देखील स्वागत केले व त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने विषयसुचीनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

सभेमध्ये विषय क्रमांक १ अन्वये उपवनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे यांनी सभे समोर आराखड्याचे सादरीकरण केले त्याचप्रमाणे विषय क्रमांक २ शी संबंधीत आराखड्याचे सादरीकरण विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), पांढरकवडा यांनी केले. त्यानंतर कार्यकारी समितीचे मा. अध्यक्षांचे परवानगीने महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादीत, नागपूर यांचे अधिनस्त किनवट; बोर व्याघ्र प्रकल्प व ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, मोहर्ली येथील पर्यटक संकुलाची देखभाल दुरुस्ती व सुशोभीकरण बाबत श्रीमती इस्तीएन्ला आओ, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, निसर्ग पर्यटन, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्या. नागपूर यांनी आराखड्याचे सादरीकरण केले. त्या नंतर उपवनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांनी सेमिनरी हिल्स, नागपूर येथे प्रस्तावित कामांबाबत आराखड्याचे सादरीकरण केले.

वरील सर्व सादरीकरण केलेल्या आराखड्यांबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

PDF Compressor Free Version

| अ.क्र. | विषय | समितीचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मौजे तांदुळवाडी गट क्र.१०० ता.बारामती,जि.पुणे येथे वन पर्यटन व वन्यप्राणी अधिवास विकसीत करणेबाबत विकास आराखड्याचे सादरीकरण. | नागरी वन उद्यान पर्यटन स्थळाचे विकासाकरीता सन २०१९-२० ते २०२०-२१ या कालावधी करीता रु. ५००.०० लक्षच्या आराखड्यास खालील अटी व शर्तीचे अधीन राहुन मान्यता देण्यात येत आहे.<br>१) सद्यःस्थितीतील गवती कुरणांचा विकास करण्यात यावा.<br>२) वन रोपनाकरीता केवळ स्थानिक प्रजातींचीच निवड करण्यात यावी. |
| २. | टिपेश्वर अभयारण्य येथे निसर्ग पर्यटन विकासाकरीता सुधारीत आराखड्याचे सादरीकरण. | सादर केलेल्या प्रस्तावातील बांधकामापैकी वनविश्रामगृहाचे रु. 454 लक्षचे प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.<br>वनविश्रामगृह तसेच इतर बांधकामाकरिता व निसर्ग पर्यटन विकासाकरीता स्थानिक साहित्याचा वापर करुन निसर्गाशी जवळीक साधणा-या वास्तुंचा समावेश करुन कशाप्रकारे निसर्ग पर्यटन विकासाच्या सोई, सवलती विकसित करण्यात येऊ शकतील या दृष्टीने सभेत सादर प्रस्तावांची तपासणी करण्यात यावी या करीता मंडळातर्फे वास्तुशास्त्रज्ञांशी समन्वय ठेवून Master Plan तयार करावा.<br>मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे एका खाजगी व्यवसायिकाने इको सेंसेटीव्ह झोन मध्ये निसर्ग पर्यटन विकास कामांबाबत दाखल जनहीत याचिकेतील मुद्दे विचारात घेऊन तसेच या संबंधात विभागाद्वारे करावयाचे कामाबाबत इको सेन्सिटिव्ह झोन संबंधातील जिल्हा संनियंत्रण समिती द्वारे परवानगी आवश्यक असल्यास ती प्राप्त करुन त्याबाबतचा अहवाल पुढील सभेत सादर करावा असे मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांना निर्देश देण्यात आले. |
| ३ | महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादीत व्दारा संचलित बोर | महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादीत व्दारा संचलित बोर व्याघ्र प्रकल्प व मोहुर्ली येथील |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| | व्याघ्र प्रकल्प व मोहर्ली येथील पर्यटक संकुलाची देखभाल दुरुस्ती व सुशोभीकरण आराखड्याचे सादरीकरण. | पर्यटक संकुलाचे देखभाल दुरुस्ती व सुशोभीकरणाच्या आराखड्यास वन्यजीव विभाग व महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचेमध्ये वरील दोन्ही पर्यटक संकूल हस्तांतरणाचे करारासंदर्भात वन्यजीव विभागाशी समन्वय साधून पुढील कार्यवाही करावी. सदर प्रस्तावांना खालील प्रमाणे मान्यता देण्यात आली.<br>१) बोर पर्यटन संकुलास रु. 143.75 लक्ष<br>२) मोहर्ली पर्यटन संकुलास रु.224.25 लक्ष<br>सदर कामांकरिता लागणा-या आवश्यक निधीची उपलब्धता महाराष्ट्र वन विकास महामंडळाने त्यांचे स्तरावर करावी. |
| ४ | महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादीत अधिनस्त किनवट येथे निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास करणे. | सादर केलेल्या आराखड्यातील बाबींना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता नाही. त्यामुळे आराखडा परिपूर्ण नसल्याने उपलब्ध क्षेत्राशी सुसंगत बाबी विचारात घेऊन आराखडा तयार करावा व त्यानंतर पुनश्च सादर करावा. |
| ५ | सेमिनरी हिल्स येथील वन पर्यटन विकासाबाबत विकास आराखडा तयार करणेसंबंधात मंजुरी बाबत. | तज्ञांच्या मदतीने संपूर्ण क्षेत्राचा आढावा करुन करावयाच्या विविध कामांचा समावेश असलेला परिपूर्ण निसर्ग पर्यटन विकास आराखडा तयार करुन नागपूर वन वृत्ताचे पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या सहमतीने मंडळाकडे सादर करावे. |

अध्यक्षांचे परवानगीने मंडळाचे कार्यकारी समितीच्या ९ व्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून दाखविण्यात आला. सदर कार्यवृत्तांतास कार्यकारी समितीने मान्यता प्रदान केली.

शेवटी व्यवस्थापकीय संचालक, निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती व
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर

PDF Compressor Free Version

परिशिष्ट - १

# दिनांक २८ फेब्रुवारी २०२० रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या १० व्या सभेमध्ये उपस्थितांची यादी

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समितीमधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | डॉ.एन. रामबाबु | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| २. | श्री. नितीन काकोडकर | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ३. | श्री.विकास गुप्ता | सदस्य सचिव | व्यवस्थापकीय संचालक, मनिपविमं, नागपूर |
| ४. | श्री. बी. एस.हुडा | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांचे कार्यालय. |
| ५. | श्रीमती. इमतीएन्ला आओ | | मुख्य महाव्यवस्थापक (औवशा) एफडीसीएमलि. नागपूर |
| ६. | श्री. संजीव गौड | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (गहाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ७. | श्री.पी.कल्याण कुमार | | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर |
| ८. | डॉ.आर.व्ही.गोवेकर | | मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर |
| ९. | श्रीमती. श्रीलक्ष्मी | | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे |
| १०. | श्री.पी.एन.शुक्ला | | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर |
| ११. | श्री.चंद्रशेखरन बाला एन | | उप महाप्रबंधक, मनिपविमं, नागपूर |
| १२. | अदिती भारद्वाज | | परिविक्षाधिन अधिकारी, नागपूर |
| १३. | श्री.सुभाष पुरानीक | | विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), पांढरकवडा |
| १४. | सौ. आर. एस. गादंडे | | विभागीय वन अधिकारी, निसर्ग पर्यटन, एफडीसीएमलि नागपूर |
| १५. | श्री. किशोर मिश्रीकोटकर | | सेवानि.विभागीय वन अधिकारी, मनिपविमं, नागपूर यांचे कार्यालय |

कार्यवृतांत प्र.मु.व.सं. (वबप्र) तथा
अध्यक्ष,का.स., मनिपविमं यांचेद्वारा मंजुर.